**आकाशवाणी पुणे**
**प्रादेशिक वृत्त विभाग**
**प्रादेशिक बातमीपत्र**
**सकाळी 07 वाजून 10 मि**

**दिनांक:06.03.2025** **वार : गुरुवार**

---

**ठळक बातम्या**

रोजगार, अर्थव्यवस्था आणि नवोन्मेषात गुंतवणूक ही संकल्पना विकसित भारताच्या मार्गाची रूपरेषा स्पष्ट करणारी असल्याचं पंतप्रधानांचं प्रतिपादन

वाढवण बंदर आणि आंतरराष्ट्रीय विमानतळामुळे सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांना चालना मिळेल – राज्यपालांचा विश्वास

प्रीपेड वीज मीटरऐवजी लवकरच इलेक्ट्रॉनिक मीटर

सर्व प्रकारच्या प्रतिज्ञापत्रांसाठी 500 रुपये मुद्रांक शुल्क माफ

आणि

चॅंपियन्स करंडक विजेतेपदासाठी भारत-न्यूझीलंड लढणार

**पंतप्रधान**

रोजगार, अर्थव्यवस्था आणि नवोन्मेषात गुंतवणूक ही संकल्पना विकसित भारताच्या मार्गाची रूपरेषा स्पष्ट करणारी असल्याचं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं आहे.

अर्थसंकल्पानंतर, रोजगारविषयक वेबिनारमध्ये ते काल बोलत होते.

सरकारनं गुंतवणुकीच्या बाबतीत पायाभूत सुविधा आणि उद्योगांबरोबरच नागरिक, अर्थव्यवस्था आणि नाविन्यपूर्ण गोष्टींना प्राधान्य दिले आहे अशी माहिती त्यांनी यावेळी दिली. गुंतवणुकीचा दृष्टीकोन, शिक्षण, कौशल्य आणि आरोग्य सेवा या तीन गोष्टींवर अवलंबून आहे. अनेक दशकांनंतर भारताच्या शिक्षण व्यवस्थेत महत्त्वपूर्ण बदल होत आहेत.

क्षमतावाढ आणि प्रतिभेला प्रोत्साहन या दोन्ही बाबी देशाच्या प्रगतीसाठी पायाभरणी करतात. त्यामुळे विकासाच्या पुढच्या टप्प्यात आपल्याला या क्षेत्रात अधिकाधिक गुंतवणूक गरजेची असून त्यासाठी संबंधितांनी पुढाकार घ्यावा, असं आवाहन त्यांनी केलं.

**राज्यपाल**

वाढवण बंदर आणि नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ यामुळं सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांना चालना मिळेल असा विश्वास राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी व्यक्त केला आहे. विकसित भारतासाठी लघु - मध्यम उद्योग क्षेत्राचा शाश्वत विकास' या विषयावरील शिखर परिषदेचं उद्घाटन काल मुंबईत करताना ते बोलत होते. यावेळी त्यांच्या हस्ते राज्यातील विविध लघु आणि मध्यम उद्योगांना उत्कृष्टता पुरस्कार

आणि “प्राइड ऑफ महाराष्ट्र” पुरस्कार प्रदान करण्यात आले. राष्ट्रीय लघु आणि मध्यम उद्योग उत्पादकता अभियानाचं उद्घाटन त्यांच्या हस्ते झालं. महाराष्ट्र औद्योगिक विकास संघटनेच्या रौप्य महोत्सवी स्थापना दिनानिमित्त या परिषदेचं आयोजन करण्यात आलं.

**बेल्जियम**

शिक्षण, आरोग्य, वैद्यकीय, तंत्रज्ञान, अक्षय ऊर्जा आणि संशोधन तंत्रज्ञान आदी विविध क्षेत्रातील सौहार्दवृद्धीसाठी बेल्जियमसोबत काल मुंबईत सामंजस्य करार करण्यात आले. बेल्जियमच्या प्रिन्सेस ॲस्ट्रिड आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यावेळी उपस्थित होते. बेल्जियमचं आर्थिक शिष्टमंडळ सध्या भारताच्या दौऱ्यावर आहे.

**मीटर**

प्रीपेड वीज मीटरऐवजी आता सहा महिन्यांत इलेक्ट्रॉनिक मीटर प्रणाली बसवली जाणार असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल विधानपरिषदेत दिली. विधान परिषदेतील प्रश्नोत्तराच्या तासात सदस्य विक्रम काळे यांनी विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना मुख्यमंत्री बोलत होते. इलेक्ट्रॉनिक मीटर वापरणाऱ्या ग्राहकांना वीज वापरावर 10 टक्के सवलत देण्यात येणार आहे असंही ते म्हणाले.

**मुद्रांक शुल्क माफ**

राज्यात सर्व प्रकारच्या प्रतिज्ञापत्रासाठी जोडावं लागणारं 500 रुपयांचे मुद्रांक शुल्क माफ करण्याचा निर्णय राज्य सरकारनं घेतला आहे. महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी काल ही माहिती दिली. या निर्णयाची अंमलबजावणी तातडीनं करण्याचे निर्देश त्यांनी दिले. मुद्रांक शुल्काऐवजी आता केवळ स्व-साक्षांकित अर्ज लिहून, तहसील कार्यालयातून प्रमाणपत्र दिली जातील. या निर्णयाचा लाभ दहावी आणि बारावीच्या विद्यार्थ्यांबरोबरच कोट्यवधी नागरिकांनाही होणार आहे.

**विधिमंडळ**

रायगडाच्या पायथ्याशी असलेल्या पाचाड इथला राजमाता जिजाऊंचा राजवाडा अधिग्रहित करून त्या ठिकाणी शिवसृष्टी उभी केली जाईल, अशी घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल विधान परिषदेत केली. निरंजन डावखरे यांच्या तारांकित प्रश्नाला ते उत्तर देत होते. राज्यात पाच वेगवेगळ्या महसुली विभागात शिवसृष्टी उभारली जाणार असून संगमेश्वर इथल्या सरदेसाई वाड्यात छत्रपती संभाजी महाराजांचं स्मारक उभारण्याची घोषणाही मुख्यमंत्र्यांनी केली.

राज्यातल्या विविध सरकारी रुग्णालयं आणि वैद्यकीय महाविद्यालयात भेसळयुक्त औषधांचा पुरवठा केल्याप्रकरणी दोषींवर कडक कारवाई करण्यात येईल असं सार्वजनिक आरोग्यमंत्री प्रकाश आबीटकर यांनी काल विधानसभेत लक्षवेधी सूचनेला उत्तर देताना सांगितलं.

दरम्यान ,जीबीएस रुग्णांवर होणारा खर्च विचारात घेता राज्य सरकारनं महात्मा फुले आरोग्य योजनेच्या अनुदानात वाढ करावी, अशी मागणी आमदार सिद्धार्थ शिरोळे यांनी काल विधानसभेत केली. राज्यात

ओबीसी समाजातल्या विद्यार्थ्यांसाठी घोषित करण्यात आलेल्या ७२ पैकी 54 वसतिगृह वर्षभरातच कार्यान्वित झाली असून उर्वरित वसतिगृह लवकरच सुरू होतील, अशी माहिती इतर मागासवर्ग कल्याण मंत्री अतुल सावे यांनी काल विधान परिषदेत दिली. दरम्यान, राज्यपालांच्या अभिभाषणाच्या आभार प्रस्तावावरही काल विधीमंडळात चर्चा झाली.

**आयुष**

देशभरातल्या आयुष केंद्रांची संख्या आता साडेबारा हजारांवर गेली असल्याची माहिती
आयुष मंत्रालयाचे केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी काल नवी मुंबईत बातमीदारांना दिली. खाद्यपदार्थ बनविताना स्वच्छता न पाळल्यामुळे जीबीएस आजार बळावला असंही त्यांनी सांगितलं.

**मोत्यांची शेती**

कोल्हापूरच्या शिवाजी विद्यापीठामध्ये प्राणिशास्त्र विभागाच्या परिसरात मोत्यांची शेती करण्याचा प्रयोग हाती घेण्यात आला आहे. ऐकुया त्याबाबत अधिक वृत्तांत...

शिवाजी विद्यापीठाच्या प्राणीशास्त्र विभागाने गेल्या वर्षी हाती घेतलेला गोड्या पाण्यातील मोत्यांच्या शेतीचा प्रयोग यशस्वी झाला आहे. विद्यापीठात पिकलेला पहिला मोती राज्यपाल आणि विद्यापीठाचे कुलपती सी. पी. राधाकृष्णन यांना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते नुकताच भेट देण्यात आला. विशेष म्हणजे या संशोधन केंद्राला महाराष्ट्र जैवविविधता मंडळाची परवानगीही मिळाली आहे. याबाबत बोलताना मोती संशोधन केंद्राचे समन्वयक आणि प्राणिशास्त्रज्ञ डॉ. नितीन कांबळे म्हणाले,

**गेल्यावर्षी 28 फेब्रुवारी म्हणजे विज्ञान दिनाच्या दिवशी शिवाजी विद्यापीठाच्या प्राणी शास्त्र विभागात गोड्या पाण्यातील मोत्याची शेती हा उपक्रम राबवला गेला याच्यामध्ये जवळजवळ 100 मोत्यांचं आपण इथं संगोपन आणि संशोधनाच कार्य चालू केलं याच्यामध्ये जवळपास वर्षभरामध्ये पूर्ण पाण्याचे quality maintain करण त्याचं ph maintain करण त्याचं tds maintain करण त्याचा अमोनिया maintain करण आणि सर्वार्थाने पाण्याची quality maintain करण हे वर्षभरासाठी काम चालू होत एक वर्षानंतर 100 शिंपल्या मधला त्याच्यामध्ये फक्त 20 टक्के mortality आढळली आहे. आणि आमच्या पूर्ण प्रयोगामध्ये आमचे सर्व पाण्याचे प्रकार आणि पाणी व्यवस्थित असल्याने सर्व वातावरण चं असल्याने आणि शिंपले कुठल्याही प्रकारे त्यात दूषितः आणि कुठलेही त्यात आजार नसल्याने आम्हाला जवळजवळ 80 टक्के एवढे शिंपले आमचे जगले आहेत त्यापैकी प्रयोगांती त्याच्यापैकी आम्ही 34 शिंपले वापरले आहेत . आणि त्यापासून यावर्षी बरोबर 12 महिन्याने आम्हाला एक शिंपला एक मोती असं सापडलेलं आहे आणि आम्ही त्यात एक प्रायोगिक तत्व म्हणून यशस्वी झालोय अस मला वाटत आणि याची पुढील उपयायोजना म्हणून याचा पुढचा टप्पा म्हणून याच प्रांगणात आम्ही 500 शिंपल्यांची**
**सुरुवात करत आहोत**

या क्षेत्रात यशस्वी प्रयोग करणारे दिलीप कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यापीठानं हा उपक्रम राबवला. याबाबत बोलताना दिलीप कांबळे म्हणाले--

**2015 मध्ये असंच नेत वरून हि बातमी वाचली होती , त्याच्यानंतर त्याचं कुतूहल निर्माण झालं , आणि मग आम्ही या मोत्यांच्या शेतीला सुरुवात केली . सर्व साधारण पहिले दोन तीन वर्ष यश मिळाले नाही त्यानंतर हळूहळू प्रयोग करत गेलो. आणि मग हळूहळू प्रयोग करत गेलो आणि मग हळूहळू मोत्यांची शेती व्हायला लागली मग मोती मिळायला लागले**
**त्यानंतर गेल्या दोन वर्षात शिवजी विद्यापीठाशी आमचा संपर्क झाला सरांनी आम्हाला डॉ. नितीन कांबळे यांनी आम्हाला संपर्क केला , कुलगुरू यांनी आम्हाला संपर्क करून आम्हाला बोलून घेतले आणि इथ आम्ही हा शिवाजी विद्यापीठात हा मोत्यांच्या शेतीचा प्रयोग चालू केला 2024 मध्ये आणि त्याच्या नंतर आता 2025 मध्ये मला चांगल्या प्रकारचे मोती आम्हाला मिळाले आणि आता हळूहळू त्याच्यामध्येच export quality ची batch आता लवकरच सुरु करत आहोत**
**कमी खर्चात जास्त नफा देणारा आणि पारंपरिक शेतीला पर्याय ठरणारा हा प्रयोग विद्यार्थी आणि शेतकऱ्यांसाठी फायद्याचा ठरू शकतो. आकाशवाणी बातम्यांसाठी कोल्हापूरहून प्रिया सरीकर यांच्यासह माधुरी कुलकर्णी, पुणे.**

**विद्यापीठ मुदत वाढ**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील विविध विभागांतील अभ्यासक्रमांच्या प्रवेशपरीक्षेसाठी ऑनलाईन अर्ज भरण्याची मुदत 13 मार्चपर्यंत वाढविण्यात आली आहे. विद्यापीठातर्फे पदवी अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी 4 एप्रिल, तर पदव्युत्तर अभ्यासक्रमांसाठी ऑनलाईन प्रवेशपरीक्षा 18 ते 20 मार्च दरम्यान घेण्यात येणार आहेत. पदवी अभ्यासक्रमांच्या प्रवेश पात्रतेचे निकष आणि प्रवेशप्रक्रियेबाबत अधिक माहितीसाठी विद्यापीठाच्या संकेतस्थळाला भेट देण्याचं आवाहन विद्यापीठानं केलं आहे.

**साहित्य अकादमी सोहळा**

साहित्य अकादमी साहित्य उत्सव उद्यापासून 12 मार्चपर्यंत नवी दिल्लीत होत आहे. यामध्ये 24 भारतीय भाषांतील 700 हून अधिक नामवंत साहित्यिक, लेखक, कवी आणि विचारवंत सहभागी होणार आहेत. 8 तारखेला साहित्य अकादमी पुरस्कार वितरण सोहळ्याचं आयोजन करण्यात आलं आहे. ज्येष्ठ समीक्षक डॉक्टर सुधीर रसाळ यांना ‘विंदांचे गद्यरूप’ या समीक्षात्मक पुस्तकासाठी साहित्य अकादमी पुरस्कार जाहीर झाला आहे.

**कासव**

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील आचरा समुद्रात काल  ऑलिव्ह रिडले कासवांच्या 110 पिल्लांना सोडण्यात आलं. पर्यावरणमित्र सूर्यकांत धुरी यांनी सरकारी नियमाप्रमाणे आचरा समुद्र किनारी कासवांच्या अंड्यांचं संवर्धन केलं असून आचरा किनाऱ्यावर सध्या कासवांची 28 घरटी आहेत.

**नक्षली**

गडचिरोली जिल्ह्यात दिरंगी-फुलणार जंगलातील चकमकीत एका पोलिस शिपायाची आणि भामरागड पंचायत समितीचे माजी सभापती सुखराम मडावी यांच्या हत्येत सहभागी असलेल्या दोन जहाल नक्षल्यांना गडचिरोली पोलिस आणि केंद्रीय राखीव दलाच्या जवानांनी भामरागड तालुक्यातील आरेवाडाच्या जंगलातून अटक केली आहे.

**स्पर्धा**

पस्तिसाव्या महाराष्ट्र राज्य पोलीस क्रीडा स्पर्धेत  पुणे शहर आणि  पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयातील 244 खेळाडूंनी भाग घेतला होता. त्यातील विजेत्या खेळाडूंचा सत्कार पुण्यातील पोलीस मुख्यालयात करण्यात आला. यावेळी  पोलिस उपायुक्त  डॉक्टर संदीप भाजीभाकरे, रक्षा विभागाचे जनसंपर्क अधिकारी अंकुश चव्हाण आदि मान्यवर उपस्थित होते.

**क्रिकेट**

आयसीसी चॅम्पियन्स चषक क्रिकेट स्पर्धेत काल लाहोरच्या गद्दाफी मैदानावर दुसऱ्या उपांत्य सामन्यात न्यूझीलंडनं दक्षिण आफ्रिकेला 50 धावांनी हरवून भारताविरुद्ध 9 तारखेला होणारी अंतिम फेरी गाठली. न्यूझीलंडनं दिलेलं स्पर्धेच्या इतिहासातील सर्वाधिक 363 धावांचं उद्दिष्ट गाठताना, दक्षिण आफ्रिका 9 बाद 312 धावा करु शकला.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरच प्रादेशिक बातमीपत्र संपलं. नमस्कार**